पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६४**

(सभावृत्तांत)

दिनांक – २३/०५/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २३/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे - मुख्यलेखापाल, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोराटे, मा.खोत मा.झगडे, मा.चितळे, मा.कापडणीस - सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.निकम, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दरडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.गावडे – मुख्य अग्निशमन अधिकारी, मा. रेखा गाडेकर – प्रशा.अधिकारी, मा.मुंढे – प्र.प्रशासन अधिकारी, (शिक्षण मंडळ), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३१) मनपाच्या उद्यानांचे नुतनीकरण करणेकामी वास्तुविशारदकाची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.३२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत विकास कामांच्या बिलांचे लेखापरिक्षणाबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) मौजे सांगवी येथील स.नं.९ मधील पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित नागरिकांचे मोजणीबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५०, ५१ या मिळकती मधील दक्षिण-उत्तर १८.०० मी. रुंद रस्त्याचे बाधित नागरिकांचे मोजणीबाबत - मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) प्रभाग क्र.१ चिखली येथील राधास्वामी आश्रम येथील २४ मी.डी.पी. रस्ता विकसीत करणे (टप्पा-२) साठी आर्कीटेक्ट व कंन्सलटंटची नेमणूक करणेबाबत – मा.साधना मळेकर, मा.सारीका लांडगे यांचा प्रस्ताव.

-------

दिनांक १६/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - २६७६ — विषय क्रमांक - ०१

दिनांक – २३/०५/२०१८ — विभाग- स्थापत्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी — अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/शअ/तां/४/९२/२०१८, दि.०९/०५/२०१८

विषय – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना रस्ता खोदाई करणेस परवानगी देणेबाबत..

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७७ — विषय क्रमांक - ०२

दिनांक – २३/०५/२०१८ — विभाग- क क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर — अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – १)मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/आ/१५/२०७/२०१८, दि.०५/०५/२०१८

२) मा.क्षेत्रीय अधिकारी, यांचेकडील पत्र क्र.कक्षे/आ१५/कावि/२४२/१८, दि.२१/०५/२०१८

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी विषय क्रमांक ०२ चे विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषयपत्र मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७८ | विषय क्रमांक - ०३

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग- स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/लेखा/१/कावि/१९९९/२०१८, दि.१०/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१११/१-२०१७-१८ प्राधिकरणाच्या विकास आराखड्यातील रावेत सी.डी.वर्क पासुन ते वाल्हेकरवाडी चौकापर्यंत ३४.५ मी रूंदीचा रस्ता विकसीत करणेकामी कृष्णाई इन्फ्रा.प्रा.लि. नि.र.रु.१५,६५,५६,३०१/- (अक्षरी र.रू. पंधरा कोटी पासष्ट लाख छपन्न हजार तीनशे एक फक्त) पेक्षा १०.५०% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा १८.२४% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदामंजूर दराने र.रू.१४,०१,१७,८८९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६७९ | विषय क्रमांक - ०४

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग- ह क्षेत्रिय, विद्युत

सूचक – मा.यशोदा बोईनवाड | अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे क्र.हक्षेका/वि/कावि/३१/२०१८, दि.११/०५/२०१८

मा. कार्यकारी अभियंता (वि) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे संत तुकाराम नगर प्रेक्षागृहाचे(अत्रे प्रेक्षागृह) नुतनीकरणाचे काम चालु आहे. सदर ठिकाणी वातानुकुलन यंत्रणेचे नुतनीकरणाचे कामांतर्गत नवीन वाढीव क्षमतेची वातानुकुलन यंत्रणा बसविणेत येणार आहे. सदर प्रेक्षागृहाचा Existing Sanction Connected Load 40KW ऐवढा आहे. परंतु Additional Connected Load 108KW ऐवढा आवश्यक आहे सदर ठिकाणचा एकूण Connected Load 148 KW ऐवढा आवश्यक आहे. म.रा.वि.वि.कं.लि. यांना एकूण र.रु.२,१२,००५/- (अक्षरी र.रू.दोन लाख बारा हजार पाच फक्त) एवढी रक्कम तातडीने अदा करणे आवश्यक आहे. सबब संत तुकारामनगर प्रेक्षागृहाच्या आवश्यक अतिरिक्त लोड/विजपुरवठा करिता र.रु.२,१२,००५/- एवढी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८० | विषय क्रमांक - ०५

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/५५०/२०१८, दि.११/०५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८१ विषय क्रमांक - ०६
दिनांक – २३/०५/२०१८ विभाग- कर आकारणी व करसंकलन
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे क्र.कर/मुख्य/०३/कावि/३५४/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांची शिफारस विचारात घेऊन –

सन **2018 - 2019** करिता कर व करेत्तर बाबींचे दर सवलतींसह लागू करणेत आलेले आहे. तसेच सन **2018-2019** या आर्थिक वर्षांत लागू करणेत येणा-या सवलत योजनांची, मिळकतकर वसुली जनजागृती मोहिमेची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांना व्हावी या करिता शहरातील विविध रेडीओ स्टेशनवरून जाहिरात प्रसिद्व करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये साउथ एशिया एफ.एम. लिमिटेड या कंपनीचे रेड एफ.एम. (93.5 FM), रिलायन्स ब्रॉडकास्ट या कंपनीचे बिग एफ.एम. (92.7 FM), एंटरटेंटमेंट नेटवर्क (इंडिया) लिमिटेड या कंपनीचे रेडीओ मिरची (98.3 FM) व रेडीओ सिटी (91.1 FM) हे खाजगी रेडीओ चॅनेल्स व ऑल इंडिया रेडीओचे प्रसार भारती (101 FM) हे शासकीय रेडीओ चॅनेल या कंपन्यांना/ चॅनेल्सना जाहिरात प्रसिद्व करण्याचे हक्क प्राप्त आहेत (Broadcasting Rights). प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रक्रिया न राबविता रेडीओ कंपन्यांकडून प्रतिसेकंदाचे दर घेऊन त्याप्रमाणे कामकाज करण्यात येणार आहे. रेडीओ चॅनेलवरून जाहिरात प्रसिद्ध करण्याकरिता प्रत्येक कंपनीचे प्रति सेकंदाप्रमाणे वेगवेगळे दर ठरलेले असतात. साउथ एशिया एफ.एम. लिमिटेड या कंपनीचे रेड एफ.एम. (93.5) व रिलायन्स ब्रॉडकास्ट कंपनीचे बिग एफ.एम. (92.7 FM) हे खाजगी रेडीओ चॅनेल्स व ऑल इंडिया रेडीओचे प्रसार भारती (101 FM) हे रेडीओ चॅनेल ऐकणा-यांची संख्या तुलनेने जास्त आहे तसेच त्यांचे प्रति सेकंद दर कमी आहेत. त्यामुळे उक्त नमूद 03 रेडीओ चॅनेल्सवरून सवलत योजनांची माहिती प्रसिद्ध करणेत येणार आहे. त्यांचेकडून दरपत्रक उपलब्ध करून घेणेत आलेले आहे. त्यानुसार -

अ) प्रसार भारती (101 FM) या शासकीय रेडीओ चॅनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट याप्रमाणे दि. 01 जून 2018 ते 30 जून 2018 या कालावधीकरिता एकूण र.रु.3,61,080/- (सर्व करांसहित) इतका खर्च अपेक्षित आहे.

आ) रेड एफ.एम. (93.5 FM) या खाजगी रेडीओ चॅनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 12 स्पॉट प्रमाणे दि. 01 जून 2018 ते 30 जून 2018 या कालावधीकरिता एकूण र.रु.3,39,840/- (सर्व करांसहित) इतका खर्च अपेक्षित आहे.

इ) बिग 92.7 FM या खाजगी रेडीओ चॅनेल वरून प्रतिदिन 20 सेकंदाचे 20 स्पॉट याप्रमाणे दि.01 जून 2018 ते 30 जून 2018 या कालावधीकरिता एकूण र.रु.2,33,640/- (सर्व करांसहित) इतका खर्च अपेक्षित आहे.

उक्त नमूद केलेप्रमाणे तिन्ही रेडीओ स्टेशनवरून जाहिरात प्रसिद्ध करणेकामी अंदाजित खर्च र.रु.9,34,560/- हा ‘मिळकतकर वसुली खर्च’ या लेखाशीर्षाचे तरतुदीमधून करणेत येईल. सदरील खर्च निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने करणेत येणार आहे. तरी उक्त

नमूद केलेप्रमाणे अंदाजित र.रु.9,34,560/- (अक्षरी र.रू. नऊ लाख चौतीस हजार पाचशे साठ फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तुत विषयामध्ये नमुद केलेल्या प्रसार भारती (१०१ एफ.एम.), रेड एफ (९३.५ एफ.एम.), बिग ९२.७ एफ.एम. या रेडिओ चॅनेलवर दिनांक ०१ जून २०१८ ते ३० जून २०१८ या कालावधीत मिळकत कराबाबत प्रसारीत करणेत येणा-या प्रत्येक दिवसाच्या प्रत्येक जाहिरातीचे, सदर जाहिरातीच्या पुढील व मागील अन्य जाहिरातींसह रेकॉर्डींग करणेत यावे व त्याची प्रत संबंधित नस्तीत जोडण्यात यावी आणि त्याप्रमाणे वरील रेडीओ चॅनलला बील अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८२ | विषय क्रमांक - ०७

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग- मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.करुणा चिंचवडे | अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे क्र.मभां/०४/कावि/३७२/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा. सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व कासारवाडी येथील प्रशिक्षणार्थीसाठी बेंचेस साहित्य खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.48/2017-18 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त लघुत्तम निविदाकार मे रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचे लघुत्तम दर प्रती नग र.रु.4225/- प्रमाणे 300 नग बेंचेस खेरदीसाठी एकुण र.रु.12,67,500/- (अक्षरी र.रु.बारा लाख सदुसष्ट हजार पाचशे फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८३ | विषय क्रमांक - ०८

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्र.मुलेप/०६/कावि/९१/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६/०४/२०१८ ते दि.२२/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९१/२०१८ दि.१५/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८४ | विषय क्रमांक - ०९

दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्र.मुलेप/०६/कावि/९२/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३/०४/२०१८ ते दि.२९/०४/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९२/२०१८ दि.१५/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८५ विषय क्रमांक - १०

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्र.मुलेप/०६/कावि/९३/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०/०४/२०१८ ते दि.०६/०५/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९३/२०१८ दि.१५/०५/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८६ विषय क्रमांक - ११

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – अग्निशामक विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे क्र.अग्नि/०२/कावि/४२३/२०१८, दि.१६/०५/२०१८

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

अग्निशामक विभागाचे अत्यावश्यक सेवेचा व संवेदनक्षम स्वरुपाचे कामकाज, तीन पाळ्यांमध्ये २४ तास वाहनचालकांची गरज लक्षात घेता, अग्निशामक दलाकरीता मंजूर रिक्त् ०५ वाहनचालक कर्मचा-यांची सोबतच्या प्रपत्रानुसार अर्हते प्रमाणे निवड केलेनुसार मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता मासिक एकवट र.रू १८,०००/- मानधनावर नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८७ विषय क्रमांक - १२

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/कावि/०६/५८२८/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील पाणीपुरवठा विभागाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेली आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेला नाही. अशा कामांच्या बिलांची ३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. त्यामुळे प्रस्तावात नमुद प्रमाणे विभागा अंतर्गत रक्कम रुपये १,७३,०५,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी त्र्याहत्तर लाख पाच हजार फक्त) वर्गीकरण करणेस

मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.
(वाढ/घट र.रु. १,७३,०५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८८ | विषय क्रमांक - १३
दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग – लेखा
सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/कावि/०६/५८२७/२०१८, दि.१५/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील पाणीपुरवठा विभागाकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची ३१/०३/२०१८ पर्यंत अदायगी होऊ शकलेली नाही. त्यामुळे प्रस्तावात नमुद प्रमाणे विभागा अंतर्गत रक्कम रुपये २९,९५,०००/- (अक्षरी र.रू. एकोणतीस लाख पंचाण्णव हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.
(वाढ/घट र.रु.२९,९५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६८९ | विषय क्रमांक - १४
दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग – स्थापत्य
सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे क्र.स्था/उद्यान/कावि/२३२/२०१८, दि.१७/०५/२०१८

विषय – प्रभाग क्र.३१ मॅगझीन चौक उद्यान विकसित करणे.

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९० | विषय क्रमांक - १५
दिनांक – २३/०५/२०१८ | विभाग – नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त, यांचे क्र.नावियो/२/कावि/२५४/२०१८, दि.११/०५/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत मा.महापालिका सभा ठराव क्र.९९८ दि.२०/९/२०१० अन्वये मंजूर धोरणानुसार १० वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचतगटांना अर्थसहाय्य देणेकामी प्रत्येक महिला बचतगटांना रक्कम रु.२५,०००/- इतके अर्थसहाय्य देणेत येते. तथापि मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.५ दि.२८/१२/२०१६ अन्वये तसेच मा.आयुक्त सो यांचेकडिल मंजूर आदेश क्र.नावियो/२/कावि/

२७२/२०१७ दि.१३/१०/२०१७ अन्वये प्रत्येक महिला बचतगटांना रक्कम रु.२५,०००/- ( अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त) इतका लाभ देणेस मान्यता आहे. त्याप्रमाणे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जाहीर प्रकटनाव्दारे अर्ज मागविणेत आले असता एकूण १४८ अर्ज मुदतीमध्ये प्राप्त झाले आहेत. योजनेच्या अटी शर्ती नुसार तपासणी केली असता ५३ अर्ज पात्र झालेले असून ९५ अर्ज अपात्र आहेत. सदर ५३ पात्र महिला बचतगटांना २५,०००/- याप्रमाणे एकूण रक्कम रु.१३,२५,०००/- (अक्षरी रक्कम रु. तेरा लाख पंचवीस हजार फक्त) इतका लाभ आदेश क्र. नाविंयो/२/कावि/१८६/२०१८ दि.२६/३/२०१८ अन्वये ECS व्दारे अदा करणेत आला आहे. सबब पात्र १० वर्ष पूर्ण झालेल्या महिला बचतगटांना अर्थसहाय्य अदा करण्याकरिता झालेल्या रक्कम रु.१३,२५,०००/- चे खर्चास तसेच यानंतर दि. ३१ ऑगस्ट २०१८ पर्यत अपात्रतेची पूर्तता करुन पात्र ठरणा-या महिला बचतगटांना प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९१ विषय क्रमांक - १६

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्व.म/भा अंमलबजावणी कक्ष

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त, यांचे जा.क्र.स्वमअक/३/कावि/१३६/२०१८, दि.१८/०५/२०१८

विषय - मे.International Association of Lions Clubs, Lion club Of Mumbai Image संस्थेमार्फत सी.एस.आर.अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरात ई-टॉयलेट बसविणेबाबत.

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९२ विषय क्रमांक - १७

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.शहर अभियंता, यांचे क्र.स्था/नि/फ-मुख्य/२७६/२०१८, दि.१८/०५/२०१८

विषय - प्रभाग क्र.१२ मधील से.क्र.२२ ओटा स्किमच्या विकसीत झालेल्या इमारतीच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे व देखभालीची कामे करणे.

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९३ विषय क्रमांक - १८

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य अ क्षेत्रीय

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त, यांचे जा.क्र.अक्षेका/स्था/कावि/५७७/२०१८, दि.१५/०५/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये जुना जी बी हॉलवर स्लॅब टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेसाठी (Architect) व PMC ची नेमणुक करणेबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९४ विषय क्रमांक - १९

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२), यांचे जा.क्र.पअक/१/कावि/१३१/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा.अति.आयुक्त (२), यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV19/1-2017-18 अन्वये मनपाच्या पर्यावरण विषयक कामांसाठी आवश्यकतेनुसार उर्जाबचत करणारे ट्रान्सफॉर्मर बसविणे व आवश्यक विद्युत विषयक कामे करणेकामी मे. इलेक्ट्रो मेकॅनिक्स यांचेकडुन नि.र.रु.९५,२२,९२८/- (अक्षरी र.रू.पंचाण्णव लाख बावीस हजार नऊशे अठ्ठावीस फक्त) पेक्षा -१२.९९% कमी या दराने प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा -१७.९४% ने कमी येत असल्याने प्राप्त दराने र.रु.८२,८५,९००/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९५ विषय क्रमांक - २०

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त, यांचे क्र.लेखा/६/कावि/५९५४/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता यांनी त्यांच्याकडील जलनि:सारण ग,ब क्षेत्रिय कार्यालयांकडील काही कामांवर तरतूदी करणे राहून गेलेले आहे. तसेच नवीन प्रभाग रचनेमुळे काही कामांचा समावेश इतर प्रभागांमध्ये झालेला आहे. त्यामुळे त्या कामांवर तरतूद झालेली नाही. अशा कामांच्या बिलांची ३१/०३/२०१८ पर्यंत बिलांची अदायगी होऊ शकलेली नाही. प्रस्तावात नमुद प्रमाणे विभागाअंतर्गत रक्कम रुपये ४७,५०,०००/ वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रु.४७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९६ विषय क्रमांक - २१

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त, यांचे क्र.मातंवि/०४/कावि/१९३/२०१८, दि.०८/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी व विविध विभागांचे E-MAIL-ID नुतनीकरण करणेकरीता निविदा सुचना क्रमांक १२/२०१७-२०१८ मधील लघुतम निविदाकार मे.टेक नाईन सर्व्हिसेस, चिंचवड यांचेकडून महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी व विभागाचे E- MAIL-ID

खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये ८,१०,९१५/- (अक्षरी रक्कम रुपये आठ लाख दहा हजार नऊशे पंधरा रूपये फक्त ) खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९७ विषय क्रमांक – २२

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त, यांचे क्र.मातंवि/०४/कावि/१९४/२०१८, दि.०८/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे www.pcmcindia.gov.in व www.pcmcetender.in या संकेतस्थळांचे सिक्युअर सॉकेट लेअरचे (SSL) नुतनीकरणकरीता निविदा सुचना क्रमांक १०/२०१७-२०१८ मधील लघुतम निविदाकार मे डिझायर ग्राफिक्स यांचेकडून सॉकेट लेअरचे (SSL) खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये ३,०२,९९२/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख दोन हजार नऊशे नब्यानऊ रूपये फक्त) खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९८ विषय क्रमांक – २३

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त, यांचे क्र.स्था/बप्र/५जा/कावि/८४/२०१८, दि.१७/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२१ (प्रभागाचे नाव-दळवीनगर) आरक्षण क्र.२७५ मध्ये शाळा इमारत बांधणेकामी आदेश ठेकेदार यांना संदर्भ क्र.२ नुसार देण्यात आलेले होते. सदर कामांतर्गत शाळेच्या पहिल्या टप्प्याचे (तळ मजला + पार्किंग) काम करण्यात येणार होते. सदर काम करताना शाळे समोरील रस्त्याच्या लेव्हल प्रमाणे जोत्याची लेव्हल दीड मीटर इतकी ठरविण्यात आलेली होती. तथापी शाळेच्या भूमिपुजनाच्या कार्यक्रमात तत्कालिन उप मुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांनी जवळच नाला असल्यामुळे नाल्याच्या HFL नुसार सदरची जोत्याची ऊंची वाढविण्यात यावी अशा सुचना दिल्या होत्या त्यानुसार सदर जोत्याची उंची नाल्याच्या HFL पेक्षा १.७ मी. वाढविण्यात आली. त्यामुळे जोत्यामध्ये भराई करण्याच्या परिमाणात मोठ्याप्रमाणात वाढ झाली. सदरचे अंदाजपत्रक तयार करताना कॉक्रिट व स्टीलचे परिमाण तळ मजला व पार्किंग या करिता लागणाऱ्या परिमाणानुसार पकडण्यात आले होते. तथापी आरसीसी डिझायनर यांनी शाळेच्या तिन्ही मजल्याच्या भारानुसार फाउंडेशन,कॉलम व बीम डिझाईन केले. त्यामुळे लागणाऱ्या कॉक्रिट व स्टीलचे परिमाणात वाढ झाली. कामाचे अंदाजपत्रक तयार करताना ४५० व ६०० मीटर व्यासचे पाईल पकडण्यात आले होते.तथापी आरसीसी डिझायनर ने ७५० मिलि मीटर व्यासाचे पाईल १२ ठिकाणी दिले. त्यामुळे पाईल फाउंडेशन करिता लागणाऱ्या रक्कमेत वाढ झाली.व कामाच्या मुळ अंदाजपत्रकात जागेभोवती सीमाभिंत बांधनेचे प्रस्तावित नव्हते.तथापी शाळा तातडीने चालू करावयाची झाल्यास सीमाभिंत बांधणे गरजेचे आहे.मुळ अंदाजपत्रकातील बाबींचे परिमाण व त्याची रक्कम व प्रत्यक्षात कामावरती लागलेल्या परिमाणाची व त्यासाठी लागलेल्या रक्कमांचा प्रस्तावात नमुद तपशीला प्रमाणे प्रेमलोक पार्क चिंचवड येथील महात्मा ज्योतिबा फुले इंग्रजी माध्यम

शाळेच्या इमारती मध्ये पोलिस आयुक्तालय करण्याचे नियोजित आहे. व तेथील शाळा दळवीनगर येथील या कामांतर्गत बांधकाम चालू असलेल्या शाळेत स्थलांतरित करण्याचे नियोजित आहे. सदर शाळेचे काम पूर्ण करावयाचे झाल्यास विषयांकित कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेत रक्कम रु.१,१८,००,०००/- इतकी वाढ होऊन सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,१०,००,०००/- इतकी होते. तसेच सदर कामाच्या खर्चात वाढ होऊन सदर कामाचा खर्च मान्य निविदा दरानुसार रक्कम रु.९१,७०,९७०/- ने वाढून रक्कम रु.३,१८,००,०००/- इतका होतो. ठेकेदाराचा मंजुर निविदा दर १६.९२%कमी असल्याने सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणे म.न.पा.च्या फायद्याचे आहे. दळवीनगर येथील शाळेच्या इमारतीत शाळा चालू करणेसाठी सदरचे अंदाजपत्रक सुधारित करणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.२१ (प्रभागाचे नाव - दळवीनगर) आरक्षण क्र.२७५ मध्ये शाळा इमारत बांधणेकामी सुधारित प्रशासकिय मान्यता रक्कम रु.४,१०,००,०००/- (वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,१८,००,०००) व सुधारित खर्च मान्य निविदा दरानुसार रक्कम रु.३,१८,००,०००/- (वाढीव खर्चाची रक्कम रु.९१,७०,९७०/-) इतक्या खर्चास व त्याप्रमाणे रक्कम रु.१,००,००,०००/- शहर विकास आराखड्यातुन या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६९९ विषय क्रमांक – २४
दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.आरोग्य कार्य.अधि., यांचे क्र.कक्षे/आ१५/कावि/२४१/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा.आरोग्य कार्य.अधि., यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार दीन महीला आधार रोज. संस्था यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर येथे प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४ या दराने १ ट्रक वाहने दि.२५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. १ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१७६५९ दि.०४/१०/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. क्र.प्रशा/०२/कावि/४६०/२०१७,दि.०७/०८/२०१७ नुसार नविन क्षेत्रिय कार्यालयांची निर्मीती झालेली असुन नविन कार्यालयांच्या निर्मिती नुसार प्रभाग क्र.२ चिखली, मोशी या परिसराचा समावेश क क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात समाविष्ट करणेत आलेला आहे.सदरच्या भागातील कुदळवाडी,जाधववाडी या परीसरात मोठया प्रमाणात भंगार मालाची दुकाने तसेच मोठया प्रमाणात नागरीकरण झाल्याने घरोघरचा कचरा उचलणे व वाहतूक करणेची यंत्रणा अपुर्ण पडत असल्याने सन्मा. सदस्य व आरोग्य निरिक्षक, मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.२ मध्ये २ वाढीव ट्रक वाहनाची मागणी केलेली आहे. क क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव १ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. त्याचप्रमाणे परीसरातील गोळा करणेत आलेला कचरा उचलणेसाठी १ ट्रक असे एकुण २ ट्रक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे म्हणुन दीन महीला आधार रोज. संस्था यांचेशी कचरा

उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन १ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३४ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार मे.दीन महीला आधार रोज. संस्थायांचेकडून मोशी डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर साठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४ या दराने आणखी २ वाढीव ट्रक वाहने दि.०१/०३/२०१८ ते दि. ३०/०४/१८ अखेर उपलब्ध करुन देणेत आलेले होते परंतू मे.दीन महीला आधार रोज. संस्था यांनी दि.०१/०५/२०१८ पासून टिपर वाहन पुरविणे बंद केलेले आहे असे सदर संस्थेने दि.०२/०५/२०१८ रोजीच्या पत्राने कळविलेले आहे. मे. महालक्ष्मी एन्टरप्रायजेस या संस्थेने दि.११/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये क क्षेत्रिय कार्यालया कडील निविदा दरानुसार म्हणजेच मे दीन महिला आधार रोजगार संस्था कामकाज करीत असलेल्या दरामध्ये काम करण्यास संमती दर्शवून दि.११/०५/२०१८ पासून प्रभाग क्र.०२ मध्ये वाहने उपलब्ध करून कामकाजास सुरुवात केलेली आहे.त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७००　　　　विषय क्रमांक – २५

दिनांक – २३/०५/२०१८　　　　विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी　　　　अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे क्र.कक्षे/आ१५/कावि/२४०/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी, यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार दीन महीला आधार रोज. संस्था यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर येथे प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.३९८७.४४ या दराने १ ट्रक वाहने दि.२५/१२/२०१७ अखेर उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. १ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१७६५९ दि.०४/१०/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. क्र.प्रशा/०२/कावि/४६०/२०१७, दि.०७/०८/२०१७ नुसार नविन क्षेत्रिय कार्यालयांची निर्मीती झालेली असुन नविन कार्यालयांच्या निर्मिती नुसार प्रभाग क्र.२ चिखली, मोशी या परिसराचा समावेश क क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात समाविष्ट करणेत आलेला आहे. सदरच्या भागातील कुदळवाडी, जाधववाडी या परीसरात मोठया प्रमाणत भंगार मालाची दुकाने तसेच मोठया प्रमाणत नागरीकरण झाल्याने घरोघरचा कचरा उचलणे व वाहतूक करणेची यंत्रणा अपुर्ण पडत असल्याने सन्मा. सदस्य व आरोग्य निरिक्षक, मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.२ मध्ये २ वाढीव ट्रक वाहनाची मागणी केलेली आहे. क क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव १ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. त्याचप्रमाणे परीसरातील गोळा करणेत आलेला कचरा उचलणेसाठी १ ट्रक असे एकुण २ ट्रक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे म्हणुन दीन महीला आधार रोज. संस्थायांचेशी कचरा उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन १ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३४ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची

आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार दीन महीला आधार रोज. संस्थायांचेकडून मोशी डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१७०.९० व कचरा स्थानांतर केंद्र, नेहरुनगर साठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु ३९८७.४४ या दराने आणखी २ वाढीव ट्रक वाहने दि.०१/०३/२०१८ ते दि.३०/०४/१८ अखेर उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०१ विषय क्रमांक – २६

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे क्र.वायसीएमएच/७/कावि/३०७/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा. अति.आयुक्त (१), यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ९४ स्टाफनर्स - GNM पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केला असता प्राप्त उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेऊन त्यामधून गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांची निवड/प्रतिक्षा यादी प्रस्तावात नमुद प्रमाणे सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०२ विषय क्रमांक – २७

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बक्षेका/स्था/काविज/१२/२२६/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

थेरगाव मध्ये डांगे चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या भोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे कामातील बाबींची आवश्यकता व निकड लक्षात घेता मा.मनपा सभा सदस्य ठराव क्र.१०२, दि. २८/११/२०१७ अन्वये र.रू. ३.५० कोटीचे प्रशासकिय मान्यता मिळाली आहे. सरचे काम सुधारित करणेसाठी स्विकृत निविदा दर (-) ८.१०% कमी इतक्या दराने र.रू. ३,४८,१३,४४७/- (अक्षरी र.रू. तीन कोटी अठ्ठेचाळीस लाख तेरा हजार चारशे सत्तेचाळीस फक्त) इतक्या सुधारित अंदाजपत्रकिय खर्चास व र.रू.१,२२,९०,६१४/- इतका वाढीव खर्च व निविदेतील अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राटी कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यानुसार काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०३ विषय क्रमांक – २८
दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे क्र.नस/५/कावि/४१४/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा.नगरसचिव, यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०४ विषय क्रमांक – २९
दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य अ क्षेत्रीय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.अक्षे/स्था/कावि/५९७/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.१० ३/१ ते ५ व ३१/१ ब २ ते ६ मधील जागेमध्ये नि:समर्थ (अपंग व मतिमंद) साठी कल्याणकारी केंद्र बांधणे हे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील पान क्र.४३ अ.क्र.७ वर आहे. सदर कामास र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रू. वीस लाख फक्त) इतकी तरतुद करणेत आली आहे. सदर प्रभागातील कल्याणकारी केंद्र बांधणे हे काम विशेष असल्याने तांत्रिक दृष्ट्या आराखड्या प्रमाणे काम करुन घेणे, त्याचे मोजमाप घेऊन देयक तयार करणे, प्रकल्पाचे दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा पश्चात काम करणे इ. काम योग्यपणे होणे आवश्यक आहे, सद्यस्थितीत सदर कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे वरील कामाकरिता तातडीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर प्रशासकीय इमारतीचे काम करणेकामी मनपा पॅनेल वरील मे. के.बी.पी. सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नेमणेचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मे. के.बी.पी. सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन निविदा पश्चात कामांसाठी निविदा रकमेच्या १.५०% अधिक वस्तु व सेवाकर (GST) अशी फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०५ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे क्र.स्था/नि/फ-मुख्य/२७८/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा.शहर अभियंता, यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.**73- 9-2017-2018** अन्वये प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण येथील सेक्टर क्र.२२ मधील ओटा स्कीम इमारत क्र.१ ते १५ च्या अंतर्गत भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी कॅन एंटरप्रायजेस नि.र.रू.**46,21,520/-** (अक्षरी रक्कम रुपये शेहेचाळीस लाख एकवीस हजार पाचशे वीस फक्त) पेक्षा **16.20%** कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने

र.रू.**38,72,834/-** पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २७०६ विषय क्रमांक – ३१

दिनांक – २३/०५/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था.उ/कावि/२०५/२०१८, दि.१०/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य उद्यान विभागाकडे सध्या विविध विकास कामे चालू आहेत. शहराची पर्यटन नगरीकडे वाटचाल करणेसाठी शहरामधील विविध भागातील ताब्यात आलेल्या उद्यानाच्या जागा यांची नागरीसुविधा व त्या अनुषंगाने विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहराचा सांस्कृतिक व धार्मिक वारसा जतन होईल तसेच शहराचे सुशोभिकरण होईल. सेंट ऍन्थोनी उद्यान, कै.पु.ल.देशपांडे उद्यान, संत शिरोमणी सावतामाळी उद्यान व प्रभाग क्रमांक २० मधील इतर उद्यानांचे नुतनीकरण करणेसाठी शेल्सस्पेस डिझाइन स्टुडिओ यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करून यांना मनपा नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०७ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २३/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध विभागांची बीले लेखा विभागाकडे सादर करण्यात येतात परंतु त्याचे लेखापरिक्षण सुमारे ३ ते ४ वर्षानंतर करण्यात येते. दरम्यानच्या कालावधीत नस्ती अथवा मोजमाप पुस्तके गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रेकॉर्ड उपलब्ध न झाल्यामुळे बरीचशी रक्कम आक्षेपाधिन राहते. सदर प्रकार टाळणेच्या दृष्टीकोनातून लेखापरिक्षणाबाबत ह्यापुढे खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यास मान्यता देणेत येत आहे.

१) प्रत्येक कामाचे अंतिम बील अदा करणेपूर्वी त्याचे लेखापरिक्षण विभागाकडून अंतर्गत लेखापरिक्षण करुन घ्यावे.

२) ज्या कामांचे अंतिम बील झाले आहे त्याची अनामत रक्कम (**Security Deposit)** परत करण्यापूर्वी अंतर्गत लेखापरिक्षण करण्यात यावे.

३) वरील प्रमाणे कार्यवाही झालेनंतर कामाची नस्ती अभिलेख कक्षात जमा करावी.

वरील प्रमाणे मा.आयुक्त यांनी सर्व संबंधित विभागांना परिपत्रक काढून आदेश द्यावेत व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०८ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २३/०५/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव –

मौजे सांगवी येथील स.नं.९ मध्ये विकास योजनेतील पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद रस्ता मंजूर असून (दत्त आश्रम ते शितोळे पेट्रोलपंप) सदर ठिकाणी श्री.ढोरे यांची जागा रस्ता रुंदीने बाधीत होत आहे. सदरचा रस्ता अद्यापी पुर्ण विकसित झालेला नाही. आता सदर ठिकाणची जागा श्री.ढोरे खाजगी वाटाघाटीने महापालिकेच्या ताब्यात देण्यास तयार आहेत. तथापि श्री.ढोरे यांची परिस्थिती साधारण असल्याने ते मोजणी करु शकत नाहीत त्यामुळे महापालिकेने सदर ठिकाणी शासकीय मोजणी करुन व सदरची रक्कम महापालिकेने श्री.ढोरे यांना जागेपोटी देय असणा-या रकमेतून वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७०९ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २३/०५/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव –

मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५०, ५१ मध्ये विकास योजनेतील दक्षिण-उत्तर १८.०० मी. रुंद रस्ता मंजूर असून जागेच्या वादामुळे सदरचा रस्ता अद्यापी पुर्ण विकसित झालेला नाही. आता सदर ठिकाणचे नागरिक खाजगी वाटाघाटीने रस्ता रुंदीने बाधीत जागा महापालिकेच्या ताब्यात देण्यास तयार आहेत. तथापि सदर नागरिकांची परिस्थिती साधारण असल्याने ते मोजणी करु शकत नाहीत त्यामुळे महापालिकेने सदर ठिकाणी शासकीय मोजणी करुन व सदरची रक्कम महापालिकेने सदर नागरिकांना जागेपोटी देय असणा-या रकमेतून वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७१० विषय क्रमांक – ३५

दिनांक – २३/०५/२०१८

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.साधना मळेकर, मा.सारिका लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१ चिखली येथील राधास्वामी आश्रम येथील २४ मी. डी.पी.रस्ता विकसित करणे (टप्पा-२) सदरचा रस्ता आधुनिक तंत्रज्ञान वापरुन विकसित करावयाचा असलेने त्यासाठी आर्कीटेक्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंन्सी नेमणे आवश्यक आहे. तरी सदर कामासाठी मे.स्वराज इंजिनिअरींग कंन्सलटंन्सी यांची नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

| Sr.No. | Catagary | Pre Tender Fees (Phase I, II, III) | Post Tender Fees (Phase IV ) | Total Fees |
|---|---|---|---|---|
| I | Up to 5 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| II | 5 to 20 Crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| III | 20 to 50 Crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| IV | Above 50 Crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

तसेच त्यांची वरील कॅटेगरीप्रमाणे Pre Tender Fees (Phase I, II, III) व Post Tender Fees (Phase IV ) अक्टीव्हीटी प्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/३१७/२०१८
दिनांक - २४/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.